सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ईमेल- – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

कालमर्यादीत

क्रमांक : १०/एडीएम/विद्यार्थी बदली/प्रणाली/२०२४/२९०  दिनांक : 08 JUL 2024

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे

२) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी पदविका संस्था

विषय: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल तसेच पहिल्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ: १) या संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एडीएम/विद्यार्थी बदली/२०२४/२७८, दि.२९/०६/२०२४
२) या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एडीएम/विद्यार्थी संस्था बदल/२०२४/२७९, दि.२९/०६/२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुकला पदविका संस्थांमधील इच्छुक विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यासाठीचे अर्ज ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल /संस्था बदल पाहिजे आहे, अशा संस्थेत दि. ०८.०७.२०२४ पर्यंत करण्यासाठी संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकान्वये सुचित करण्यात आलेले आहे. यानुसार विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्था बदलासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांवर संदर्भ क्रमांक २ च्या पत्रासोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही नियमानुसार कालमर्यादेत करण्याबाबत सर्व संस्था तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांना कळविण्यात आलेले आहे. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी पालन करावयाच्या नियमांची सविस्तर माहिती संदर्भीय २ च्या पत्रात नमुद करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन अभियांत्रिकी पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल तसेच पहिल्या वर्षानंतर संस्था बदल ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये अभियांत्रिकी पदविका संस्थेतील पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/संस्था बदलांबाबत ऑनलाईन पद्धतीसाठी संस्था व विभागीय कार्यालये यांनी करावयाच्या कार्यवाहीची माहिती नमुद केलेली आहे. तरी संदर्भीय १ व २ मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीसोबतच या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या सुचनांनुसार आपल्या कार्यालयाकडुन ऑनलाईन पद्धतीने देखील कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत आपण आपल्या अधिनस्त असलेल्या संस्थांना देखील आपल्या स्तरावरुन कळवावे.

सोबत : प्रपत्र

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई — आवश्यक कार्यवाहीसाठी

Online Application System for the Transfer of the Candidates for Diploma Courses 2024-25

1. Instructions to the Candidates.

   a. The Candidate shall approach the parent institute and obtain the NOC.

   b. The Candidate shall contact the institute where candidate seeks/aspiring for transfer and submit the Application Form.

2. Instructions to the destination Institute where candidate seeks/aspiring for transfer

   a. Institute shall update the result of the candidates admitted in the institute for previous year and confirm the vacancy position after internal branch changes, if any.

   b. The institute shall collect the Application Forms for transfer, other relevant documents and the NOC issued by the parent Institute.

   c. The destination institute will raise the request for the candidate who is willing for transfer in their institute.

   d. The Institute shall update the details in the system and upload Candidate's Application Form along with NOCs and required document.

   e. The destination institute will forward the request to RO along with all the required documents of the Candidate.

   f. In case of revert back by RO, institute shall comply and re-submit.

3. Instructions to the Regional Office

   a. Once the RO receives the request, the RO will verify the request raised along with all the documents of the candidate.

   b. Once the verification is done, the RO will approve/reject/revert back the request.

   c. The RO shall again re-verify the application re-submitted by the institute, if any.

   d. If the request is approved,

      - In case of inter-region: The transfer will take place; the vacancy will be reflected accordingly in both parent and destination institutes. The system shall generate the transfer order which will reflect in parent and destination institute.

      - In case of intra-region: The application shall be forwarded to the DTE for necessary action. After Transfer Order by DTE, the transfer will take place in the system, the vacancy will be reflected accordingly in both parent and destination institutes.

   e. If the request is rejected, parent and destination institute will be made aware the reason of rejection by the RO.

---x--